पाहिजेत
दैनिक अट्टल संकेतसाठी संपूर्ण महाराष्ट्रात वार्ताहर, प्रतिनिधी नेमणे आहेत.
संपर्क - ९६२३४८४४८४

दैनिक
# अट्टल संकेत
ATTAL SANKET

Email : attalsanket2023@gmail.com
RNI No. MAHMAR/2023/87816

■ दैनिक ■ छत्रपती संभाजीनगर ■ वर्ष-२ ■ अंक-३३१ ■ गुरूवार, दि. ३ एप्रिल २०२५ ■ पाने ४ ■ किंमत २ रूपये
■ Daily ■ Chhatrapati sambhajinagar ■ Vol.2 ■ Issue -331 ■ Thursday, 3 April 2025 ■ Pages-4 ■ Price- 2/-

## आजचे पुढारी पाया पडण्याच्या लायकीचे नाहीत पण चुलत्याच्या कृपेने आमचं बरं चाललंय!

### बीड दौऱ्यात अजित पवारांची सडेतोड भाषा

**बीड (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार बीड दौऱ्यावर असताना त्यांच्या भाषणाने राजकीय वतुर्ळात खळबळ उडवली. ङ्गआई-बापाच्या आणि चुलत्याच्या कृपेने आमचं बरं चाललंय,ङ्घ असं वक्तव्य करत त्यांनी अप्रत्यक्षपणे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते शरद पवार यांचा उल्लेख केला.

यावेळी अजित पवार यांनी तरुणांना पुढाऱ्यांच्या पाया पडण्याऐवजी त्यांच्या इतिहासाचा विचार करण्याचा सल्ला दिला. ङ्गआजचे पुढारी पाया पडण्याच्या लायकीचे नाहीत,ङ्घ असे म्हणत त्यांनी राजकारण्यांवर तिखट शब्दांत टीका केली.

सोशल मीडियाच्या गैरवापराबाबतही अजित पवार यांनी इशारा देत म्हटले, ङ्गगैरसमजात राहू नका, टेक्नॉलॉजी खूप पुढे गेली आहे, चुकीचे मेसेज पाठवले आणि अडकलात तर मी सोडवायला येणार नाही. बीड जिल्ह्यातील गुन्हेगारी प्रवृत्ती आणि गँगविषयी बोलताना, ङ्गराख गोळा करणारी गँग, वाळू तस्करीची गँग, भूखंड गँग यांना सरळ करणार,ङ्घ असे अजित पवार यांनी ठणकावले.

राजकीय, सामाजिक आणि विकासकामांवर सडेतोड भाष्य करत, बीड जिल्ह्यात लवकरच विमानतळ आणि इनोव्हेशन सेंटर उभारण्याचा मनोदयही अजित पवार यांनी व्यक्त केला. आपल्या बीडमधील भाषणात अजित पवार यांनी युवकांना उद्देशून अनेक मोलाचे सल्ले दिले. बोलताना भान बाळगा हे सांगत असतानाच पुढाऱ्यांच्या पाया पडायचं असेल तर त्याची हिस्ट्री आठवा असाही सल्ला दिला. तसंच माझ्या पाया पडायला येऊ नका, हार, टोप्या, मानचिन्ह काही देऊ नका. आपल्याला पुढे जायचं असेल तर सर्वधर्म समभाव जपला पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांनी अठरा पगड जातींना सगळ्या समाजांना घेऊन स्वराज्याची स्थापना केली. विशिष्ट समाजाचेच लोक महाराजांच्या दरबारी होते असं काहीजण सांगतात त्याला काही अर्थ नाही. महाराजांच्या दरबारी अल्पसंख्याक समाजातलेही लोक होते. एका धार्मिक स्थळाजवळ जिलेटिन उडवण्यात आले ही विकृती आहे, असे अजित पवार म्हणाले.

**सर्वांची अंडीपिल्ली बाहेर येतात**

अनेकदा सोशल मीडियाचाही वापर चांगल्या पद्धतीने होत नाही. थहरीं ी अर्ी वरुन काहीतरी मेसेज करायचे. चुकीचं काहीतरी पाठवायचं. आमचे नेते म्हणजे देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार पदावर बसले आहेत. त्यामुळे आता मला कोण काय बोलणार आहे? या गैरसमजात राहू नका. मेसेज डिलिट केला तरीही सगळे मेसेज मिळतात. अशा गोष्टी केल्या आणि अडकलात तर मी सोडवायला येणार नाही.

काही लोकांना तर मी मकोका लावायला सांगितला आहे. डिलीट केलेले ते सर्व फोटो, मेसेज रिकव्हर होतात. ग्रामीण भागात सर्वांची अंडीपिल्ली बाहेर येतात. मी फार पोहोचलेलो आहे, असे विचार मनात आणू नका, असेही त्यांनी सांगितले. तसेच मी कुणाचीही दादागिरी खपवून घेणार नाही हे लक्षात ठेवा, असाही इशारा अजित पवारांनी दिला.

### बीडमध्ये रेल्वे यायला विलंब झाला, त्याला जबाबदार कोण?

बीडमध्ये रेल्वेचं काम किती वर्षे चाललं आहे, हा प्रश्न बीडकरांनी स्वत:ला विचारला पाहिजे. बीडमध्ये रेल्वे यायला इतका विलंब झाला, त्याला जबाबदार कोण? कोणीतरी याची नैतिक जबाबदारी घेतली पाहिजे. कोणीतरी येणार आणि जादूची कांडी फिरवून काम करणार, असं होत नसतं. त्यासाठी पाठपुरावा करावा लागतो. मी आता माझ्या एका अधिकाऱ्याची नेमणूक केली आहे. मंत्रालयातही सेक्रेटरी लेव्हलचा माणूस नेमला आहे. या माध्यमातून पाणी, वीज, बीडमधील राष्ट्रीय महामार्ग, शक्तिपीठ महामार्ग, विमानतळ यावर देखरेख ठेवली जात आहे, असेही अजित पवार यांनी सांगितले.

## गुजरात : जग्वार लढाऊ विमान कोसळले

जामनगर : गुजरातच्या जागमनगरमध्ये आज, बुधवारी रात्री भारतीय वायुसेनेचे जग्वार लढाऊ विमान कोसळल्याची घटना घडली. जामनगरच्या सुवार्डा गावाबाहेर हा अपघात घडला असून अपघातानंतर विमानाचे तुकडे होऊन परिसरात धुराचे लोट पसरल्याची माहिती स्थानिकांनी दिली.

या घटनेचा एक व्हिडिओही समोर आला असून त्यात वैमानिक जमिनीवर जखमी अवस्थेत पडलेला आहे आणि त्याच्याभोवती लोकांची गर्दी जमली आहे. तसेच, विमानाचे तुकडे इकडे तिकडे विखुरलेले आहेत आणि आग लागल्याचे दिसून येते. घटनेची माहिती मिळताच पोलिस प्रशासन घटनास्थळी पोहोचले आणि परिस्थिती नियंत्रणात आणली.

पायलटला उपचारासाठी रुग्णालयात पाठवण्यात आले असून हवाई दलाचे वरिष्ठ अधिकारीही घटनास्थळी पोहोचले आणि अपघाताच्या कारणांचा तपास सुरू केला. गेल्या महिन्यातही हरियाणातील पंचकुलाजवळ सिस्टीम बिघाडामुळे एक जग्वार लढाऊ विमान कोसळले होते. वैमानिकाने विमानाला गर्दीच्या ठिकाणांपासून सुरक्षितपणे दूर नेण्यात यश मिळवले. हे विमान अंबाला एअरबेसवरून प्रशिक्षण उड्डाणासाठी निघाले होते.

## आम्हाला किमान राज्यपाल तरी करा : सदाभाऊ खोत

सांगली : गोपीचंद पडळकर निश्चितपणे मंत्री होतील, पृथ्वीराज देशमुख खासदार, आमदार होतील, आम्हाला राज्यपाल तरी करा, अन्यथा आमची अवस्था वाजंत्र्यासारखी व्हायची, असे आमदार सदाभाऊ खोत म्हणाले. खानापूर येथे शिवाजी विद्यापीठाचे उपकेंद्र मंजूर करण्यात पुढाकार घेतल्याबद्दल आणि जत विधानसभा निवडणुकीत दणदणीत विजय संपादन केल्याबद्दल विट्यात आ. पडळकर यांचा सत्कार मंगळवारी सायंकाळी आयोजित करण्यात आला होता. यावेळी आ. खोत बोलत होते. यावेळी माजी आमदार पृथ्वीराज देशमुख उपस्थित होते. यावेळी बोलताना आ. खोत म्हणाले, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस एक दिवस गोपीचंद पडळकर यांना नक्की मंत्री करतील असा मला विश्वास आहे. यावेळी उपस्थित असलेल्या देशमुखांना ते म्हणाले, तुम्ही खासदारकीला मैदानात उतरा, आम्ही दोघे तुम्हाला खासदार करतो. गोपीचंद मंत्री व्हा, देशमुख आमदार, खासदार व्हा, मात्र, आम्हाला राज्यपाल करा. नाही तर आमची अवस्था वाजंत्री वाजवणाऱ्यासारखी व्हायची असे म्हणताच सभेत हशा पिकला.

## दादांच्या दौऱ्याकडे पाठ, पण 'फॅशन शो'ला मात्र हजेरी! आजारपणाचे सोंग कशासाठी?

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

संतोष देशमुख हत्या प्रकरणातील धक्कादायक फोटो समोर आल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे (उ्हरपरपक्षरू चींपवश) यांनी आपल्या पदाचा राजीनामा दिला. त्यानंतर ते कोणत्याही पक्षाच्या बैठकीला किंवा सार्वजनिक कार्यक्रमाला हजर राहिलेले दिसले नाहीत. आज उपमुख्यमंत्री व पालकमंत्री अजित पवार बीड दौऱ्यावर होते. यावेळी धनंजय मुंडे उपस्थित असतील, अशी शक्यता वर्तवली जात होती. मात्र ते अनुपस्थित राहिल्याने त्यांच्या ठिकाणी असलेल्या वास्तविकतेबाबत चर्चांना उधाण आले.

**धनंजय मुंडे आजारी की कुठे?**

धनंजय मुंडे यांच्या अनुपस्थितीबाबत विचारले असता अजित पवार आणि मंत्री पंकजा मुंडे यांनी त्यांच्या प्रकृती अस्वास्थ्याबद्दल माहिती दिली. अजित पवार म्हणाले, ङ्गधनंजय मुंडे यांनी मला कॉल करून कळवले की, त्यांची तब्येत बरी नाही आणि ते उपचारासाठी दवाखान्यात दाखल होत आहेत, त्यामुळे ते दौऱ्यावर येऊ शकत नाहीत.ङ्घ

याचबरोबर, पंकजा मुंडे यांनीही हाच दावा केला की, धनंजय मुंडे यांची तब्येत बरेच दिवस ठीक नाही. मात्र याचदरम्यान मुंबईतील एका फॅशन शोमध्ये धनंजय मुंडे सहभागी झाल्याचा व्हिडिओ समोर आल्याने चर्चांना नवा रंग मिळाला.

**फॅशन शोमध्ये हजेरीने संभ्रम वाढला**

धनंजय मुंडे यांनी आज सकाळी ट्विटरवरून माहिती दिली होती की, त्यांची तब्येत ठीक नसल्याने ते मुंबईत उपचार घेत आहेत आणि बीडमधील कार्यक्रमांना हजर राहू शकणार नाहीत. त्यांनी पक्ष नेतृत्वालाही याची पूर्वसूचना दिली होती.

मात्र याच दिवशी रात्री गेट वे ऑफ इंडिया येथे झालेल्या फॅशन शोमध्ये ते उपस्थित असल्याचे समोर आले.

या फॅशन शोमध्ये धनंजय मुंडे आणि राजश्री मुंडे यांची मुलगी वैष्णवी मुंडे सहभागी झाली होती. त्यामुळे एकीकडे आजारी असल्याचा दावा आणि दुसरीकडे पक्षाच्या महत्त्वाच्या बैठकीला अनुपस्थित राहून फॅशन शोमध्ये हजेरी, यामुळे धनंजय मुंडे यांच्या भूमिकेवर राजकीय वतुर्ळात वेगवेगळ्या तर्कवितर्कांना उधाण आले आहे. धनंजय मुंडे यांच्या मनात नेमकं काय चाललंय, अशी राजकीय वतुर्ळात चर्चा सुरू झाली आहे.

## राज्यसरकारचा मोठा निर्णय ! जुनं वाहन मोडीत काढाल तर नवं घेताना मिळेल 'इतके' टक्के कर सवलत

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

वाहन खरेदी करणाऱ्यांसाठी महत्त्वाची बातमी. तुमच्याकडेही जुनी गाडी असेल तर ती देऊन नवीन गाडी घेताना तुम्हांला वार्षिक करामध्ये काही टक्के सवलत देण्यात येणार आहे. स्वेच्छेने वाहन मोडीत (स्क्रॅप) काढणाऱ्या वाहनधारकांना पुन्हा त्याचप्रकारचे नवीन वाहन खरेदी करताना १५ टक्के कर सवलत देण्याचा निर्णय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखालील झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

नोंदणीकृत वाहन निष्कासन केंद्रावर परिवहन प्रकारातील वाहनांना नोंदणीपासून ८ वर्षांच्या आत वाहन स्वेच्छेने मोडीत काढल्यास तसेच परिवहनेतर प्रकारातील वाहनांना नोंदणी पासून १५ वर्षांच्या आत स्वेच्छेने वाहन मोडीत काढल्यास १० टक्क्यांची कर सवलत दिली जात होत होती.

यापुढे एकरकमी कर लागू असणाऱ्या परिवहन (ट्रान्सपोर्ट) तसेच परिवहनेतर वाहनांना कराच्या १५ टक्के सवलत दिली जाणार आहे. तर ज्या वाहनांना वार्षिक कर लागू आहे अशा परिवहन प्रकारातील वाहनाच्या नोंदणी दिनांकापासून पुढील ८ वर्षांपर्यंत तर परिवहनेतर प्रकारातील वाहनांसाठी पुढील १५ वर्षांपर्यंत वार्षिक करात १५ टक्के सवलत देण्यात येणार आहे. नोंदणीकृत केंद्रावर (आरव्हीएसएफ) वाहन मोडीत (स्क्रॅप केल्यानंतर ) काढल्यानंतर वाहन धारकास मिळालेले ठेव प्रमाणपत्र (Certificate of Deosit) कर सवलतीसाठी पुढील दोन वर्षे वैध राहणार आहे. यात ज्या प्रकारचे म्हणजेच दुचाकी, तीन चाकी किंवा हलके मोटार वाहन मोडीत काढलेले असेल, त्याच प्रकारचे वाहन खरेदीनंतर नोंदणी करताना ही कर सवलत लागू होणार आहे. याबाबतची अधिसूचना जाहीर झाल्यापासून तीन वर्षांच्या आत असे वाहन स्वेच्छेने मोडीत (स्क्रॅप) काढल्यास ही कर सवलत मिळणार आहे.

## गणवेशाची रंगसंगती निवडण्याचा अधिकारही शाळांनाच; शिंदे सरकारच्या काळातील योजनेतून सपशेल माघार

पुणे : 'एक राज्य एक गणवेश' योजनेमुळे प्रचंड गोंधळ उडाल्यानंतर आता शालेय शिक्षण विभागाने या योजनेतून सपशेल माघार घेतली आहे. येत्या शैक्षणिक वर्षापासून गणवेश योजना जुन्या पद्धतीनुसार, शाळा व्यवस्थापन समितीच्या माध्यमातून राबवली जाणार असतानाच आता गणवेशाचा रंग आणि रचना ठरवण्याचा अधिकारही शाळांकडे देण्यात आला आहे. त्यामुळे राज्यातील गणवेश गोंधळ संपुष्टात येणार आहे.

दीपक केसरकर शालेय शिक्षणमंत्री असताना समग्र शिक्षा योजनेअंतर्गत मोफत गणवेश योजनेत शिक्षण विभागाने बदल केला. शालेय स्तरावरील गणवेश खरेदीची पद्धत मोडीत काढून राज्याच्या पातळीवर एकच गणवेश लागू करण्यात आला. मात्र यामुळे राज्यभरात प्रचंड गोंधळ उडाला. विद्यार्थ्यांना गणवेश न मिळणे, मापाचे नसलेले, फाटके-उसवलेले गणवेश मिळणे असे अनेक प्रकार घडले. त्यामुळे या योजनेवर राज्यभरातून प्रचंड टीका झाली. शैक्षणिक वर्ष २०२५-२६पासून योजनेची अंमलबजावणी शाळा व्यवस्थापन समितीमार्फत करण्याचे डिसेंबरमध्ये जाहीर झाले. त्यानंतर आता गणवेशाचा रंग आणि रचनाही स्थानिक पातळीवर निश्चित करण्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीला अधिकार देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे.

## महावितरणच्या दरकपातीला स्थगिती; मुख्यमंत्र्यांच्या विधानाच्या विसंगत वीज मंडळाची भूमिका

मुंबई : राज्यातील सर्वच कंपन्यांच्या वीजदरात एक एप्रिलपासून कपात करण्याच्या निर्णयाला महावितरणने आव्हान दिल्यानंतर राज्य वीज नियामक आयोगाने त्याला स्थगिती दिली आहे. राज्यातील वीजदरांत येत्या पाच वर्षांत टप्प्याटप्प्यात कपात करण्याचा मनोदय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकत्याच पार पडलेल्या विधिमंडळ अधिवेशनात व्यक्त केला होता. मात्र, त्यांच्याच अधिपत्याखालील महावितरणने आर्थिक गणित पुढे करून वीजदर कपातीला विरोध केल्याने आश्चर्य व्यक्त होत आहे.

१ एप्रिल पासून पाच वर्षातील वीजदरांमध्ये कपात करण्याच्या स्वत:च्याच आदेशांना दोन दिवसांतच स्थगिती देण्याची पाळी राज्य वीज नियामक आयोगावर बुधवारी आली. आयोगाच्या दरकपातीच्या निर्देशांमुळे महावितरण आणि काही संवर्गातील ग्राहकांचे मोठे नुकसान होईल, असा दावा महावितरणने केला आहे. यासाठी महावितरणने दाखल केलेल्या केवळ एका अर्जाची दखल घेत आयोगाने आपल्या २८ मार्चच्या संपूर्ण आदेशालाच स्थगिती दिली. हे अतिशय दुमिर्ळ उदाहरण असून फेरविचार याचिकेवर निर्णय होईपर्यंत महावितरणने २०२४-२५ च्या वीजदरांप्रमाणे ग्राहकांना वीजबिले पाठविण्याचे निर्देश आयोगाने दिले आहेत. महावितरणचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक यांच्यासह अन्य वीज कंपन्यांनी या आदेशांचे स्वागत केले होते. भाजपचे प्रवक्ते असलेल्या पाठक यांनी आता स्थगिती आदेशांचेही स्वागत केले आहे. महावितरणने सुमारे ४८ हजार कोटी रुपयांची महसुली तूट दाखविली असताना आयोगाने वित्तीय ताळेबंद मांडून सुमारे ४४ हजार कोटी रुपये शिल्लकी महसूल असल्याचा निष्कर्ष काढला. त्यामुळे सुमारे ९२ हजार कोटी रुपयांची तूट महावितरणला पुढील पाच वर्षात येईल, अशी भूमिका पाठक यांनी मांडली आहे.

## कोणाच्याही धार्मिक भावना दुखावण्याचा सरकारचा हेतू नाही - गृहमंत्री अमित शहा

### गृहमंत्री अमित शहांनी 'वक्फ'च्या चर्चेदरम्यान मांडली रोखठोक भूमिका

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

वक्फशी संबंधित धार्मिक कार्यात गैर-मुस्लिमांना समाविष्ट केले जाणार नाही. परंतु, काही लोक या मुद्द्यावर गैरसमज पसरवून आपली मतपेढी सुरक्षित करण्यासाठी राजकारण करत आहेत. त्यांनी स्पष्ट केले की, वक्फ बोर्ड आणि वक्फ कौन्सिलमधील बिगर म ुस्लिम सदस्य केवळ काम योग्यरित्या होत आहे की नाही याची खात्री करण्यासाठी असतील. कोणाच्याही धार्मिक भावना दुखावण्याचा सरकारचा हेतू नसल्याची रोखठोक भूमिका वक्फ विधेयकावरील चर्चेदरम्यान लोकसभेत बोलताना गृहमंत्री अमित शहा यांनी मांडली.

संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी लोकसभेत वक्फ दुरुस्ती विधेयक मांडले असून, त्यावर चर्चा सरू आहे. ऑल इंडिया मुस्लिम पर्सनल लॉ बोर्डने वक्फ दुरुस्ती विधेयकाला तीव्र विरोध केला आहे. याचबरोबर विरोधी पक्षांच्या अनेक नेत्यांनीही याला विरोध केला आहे. विधेयकाविरोधात काँग्रेसने मोठा गोंधळ घातला. गृहमंत्री अमित शहा यांनी काँग्रेसच्या आरोपांना प्रत्युत्तर दिले.

संसदेत वक्फ विधेयकावरील चर्चेदरम्यान, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी पूर्ण ताकदीने त्याचे समर्थन केले. ते म्हणाले, वक्फ सुधारणा विधेयक २०२४ लोकसभेत सादर करण्यात आले आहे. एक लाख अडतीस हजार एकर जमीन भाड्याने देण्यात आली, खाजगी संस्थांची जमीन शंभर वर्षांच्या भाडेपट्ट्यावर हस्तांतरित करण्यात आली, विजयपूर गावातील १५०० एकर जमीन दावा करून वादात टाकण्यात आली. पंचतारांकित हॉटेल १२००० रुपये भाड्याने देण्यात आले. दरमहा १२००० रुपये दिले आणि सांगितले की हे पैसे गरीब मुस्लिमांचे आहेत. हे श्रीमंतांनी चोरी करण्यासाठी नाही. त्यांचे कंत्राटदार बोलतात, असेही शहा म्हणाले.

कर्नाटकात मंदिरावर दावा केला, ६०० एकर जमिनीवर दावा केला. तसेच ख्रिश्चन समुदायाच्या मालकीच्या बऱ्याच जमिनीवर दावा केला. अनेक गट वक्फ विधेयकाला विरोध करत आहेत. तेलंगणामधील १७०० एकर जमिनीवर आणि आसाममधील मोरेगाव जिल्ह्यातील जमिनीवर दावे करण्यात आले. हरयाणातील गुरुद्वाराची जमीन वक्फला सुपूर्द करण्यात आली. प्रयागराजमधील चंद्रशेखर आझाद उद्यानालाही वक्फ घोषित करण्यात आले. हे सर्व चालू आहे, वक्फ हा मुस्लिम बांधवांच्या देणग्यांमधून तयार केलेला ट्रस्ट आहे, सरकार त्यात हस्तक्षेप करू इच्छित नाही. लाखो कोटी रुपयांची जमीन आणि १२६ कोटी रुपयांचे उत्पन्न. हे आपल्याला उत्पन्नाचा उद्देश काय आहे ते सांगतात, असेही शहा म्हणाले.

**महाराष्ट्रातील महादेव व कंकालेश्वर मंदिरावरही वक्फचा दावा**

यावेळी बोलताना अमित शाह यांनी महाराष्ट्रातील दोन गावांमधील मंदिरांवर केलेल्या दाव्याचा उल्लेख केला. ते म्हणाले, महाराष्ट्रातील वडांगे गावातील महादेव मंदिरावर वक्फ बोर्डाने दावा केला होता. याचबरोब बीडमधील कंकालेश्वर मंदिराची १२ एकर जमीन वक्फ बोर्डाने जबरदस्तीने ताब्यात घेतली होती.

## नद्या स्वच्छतेचे तीन तेरा

**भारत** हा नद्यांचा देश म्हणून ओळखला जातो. गंगा, यमुना, गोदावरी, कृष्णा, नर्मदा, तापी यांसारख्या मोठ्या नद्यांपासून ते स्थानिक नद्यांपर्यंत सर्व नद्या लाखो लोकांच्या जीवनाचा अविभाज्य भाग आहेत. मात्र, वाढती लोकसंख्या, औद्योगिकीकरण, शहरीकरण आणि अपुऱ्या स्वच्छता सुविधा यामुळे नद्यांचे प्रदूषण वाढत आहे. विशेषतः महाराष्ट्रातील गोदावरी, भीमा, पंचगंगा आणि मुळा-मुठा नद्यांमध्ये प्रदूषणाची पातळी चिंताजनक बनली आहे. भारतातील नद्यांमधील प्रदूषणाचे प्रमाण मोजण्यासाठी केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ वेळोवेळी अभ्यास आणि अहवाल प्रकाशित करते. या अहवालांनुसार, देशभरातील ३५१ नद्या अत्यंत प्रदूषित असून ४५ नद्या महाराष्ट्रातील आहेत, ज्या 'गंभीर प्रदूषित' गटात मोडतात. नीती आयोगाच्या अहवालानुसार-२०३० पर्यंत भारतात पिण्यायोग्य पाण्याचा तुटवडा निर्माण होऊ शकतो, याचे एक कारण म्हणजे जलप्रदूषण. नीती आयोग आणि प्रदूषण मंडळाच्या संयुक्तिक अहवालानुसार, गंगा आणि यमुना यांसारख्या नद्यांमध्ये जैविक ऑक्सिजनची पातळी अत्यंत कमी आहे आणि यामुळे जलचरांचे अस्तित्व धोक्यात आहे. नदीप्रदूषणाची पाच प्रमुख कारणे अभ्यासांमधून दिसून आली आहेत. एक म्हणजे औद्योगिक कचरा. देशातील औद्योगिक क्षेत्रांतून रासायनिक सांडपाणी नद्यांमध्ये मिसळत असून त्यामुळे नद्यांचे पाणी विषारी बनत आहे. याखेरीज शहरे आणि गावांतून नद्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर मैला सोडला जातो. अनेक नद्यांमध्ये प्लास्टिकचा ढीगही वाढत चालला असून यामुळे नद्यांमधील परिसंस्थेची हानी होत आहे. शेतीमधील कीटकनाशके आणि रासायनिक खतांमुळेही जलप्रदूषण वाढत आहे. याखेरीज मूर्ती विसर्जन, पूजेचे साहित्य टाकणे यामुळेही नदीप्रदूषण वाढत आहे.

अलीकडेच जलशक्ती मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, सांडपाणी व्यवस्थेतील त्रुटींमुळे नद्यांचे प्रदूषण दूर करण्यात अपेक्षित यश मिळत नाही. वस्तुतः या माहितीत नवीन काही नाही. किंबहुना, हे वास्तव वेळोवेळी समोर येत आहे. नद्यांच्या काठावर वसलेल्या शहरांच्या सांडपाणी व्यवस्था सुधारण्याचे काम पूर्ण होत नाही ही निराशाजनक आणि चिंताजनक बाब आहे. नदीकाठावर वसलेल्या शहरांतील सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प पूर्ण क्षमतेने काम करत नाहीत, हे कुणापासून लपून राहिलेले नाही. काही ठिकाणी त्यांची क्षमता इतकी कमी आहे की त्यांना गटारातील घाण पाण्यापैकी निम्मे पाणीही प्रक्रिया करता येत नाही. दुसरी समस्या अशी आहे की ही संयंत्रे खराब झालेली आहेत.

वास्तविक पाहता, आपापल्या राज्यांमध्ये सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प पुरेशा संख्येत आहेत की नाही आणि असणारे प्रकल्प पूर्ण क्षमतेने काम करताहेत की नाही हे पाहण्याची जबाबदारी राज्य सरकार आणि त्यांच्या स्थानिक स्वराज्य संस्थांची आहे. परंतु त्यांचे काम नीट होत नाहीये हे लक्षात आल्यानंतर केंद्र सरकारने राज्यांवर दबाव आणला पाहिजे. यात विलंब होता कामा नये, कारण अनेक शहरांतील घाण नाले अद्याप सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांना जोडलेलेही नाहीयेत. त्यामुळे घाण नाल्यातील कचरा थेट नद्यांमध्ये जात आहे. केंद्र आणि राज्य सरकारने ज्या नद्या प्रदूषणमुक्त करण्याचे वचन दिले होते, त्या नद्यांचाही प्रदूषित नद्यांच्या यादीत समावेश आहे, ही बाब अधिक गंभीर म्हणावी लागेल. सर्व नाले सांडपाणी प्रक्रिया प्रकल्पांना जोडण्याबाबत आणि त्यातून कोणत्याही परिस्थितीत घाण पाणी नद्यांमध्ये जाणार नाही, यासाठी कोणतीही कालमर्यादा निश्चित का केली जात नाही? याबाबत कोणताही ठराव का केला जात नाही? हा प्रश्न अनाकलनीय आहे.

नद्यांच्या प्रदूषणाचे आणखी एक प्रमुख कारण म्हणजे त्यांच्या काठावर उभारलेल्या उद्योगांकडून सोडले जाणारे रसायनमिश्रित पाणी. याला कारणीभूत आहे सरकारी यंत्रणांचा नाकर्तेपणा. औद्योगिक कचरा नद्यांमध्ये जाऊ नये हे पाहण्यासाठी आणि त्यावर नियंत्रण मिळवण्यासाठी या यंत्रणांची निर्मिती केली गेली असूनही त्या कुचकामी ठरत आहेत. मध्यंतरीच्या काळात केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाने नद्यांमध्ये विषारी कचरा टाकणाऱ्या ७३ उद्योगांना टाळे ठोकण्याचे आदेश दिले होते. पण एवढ्यावर समाधान मानता येणार नाही. नदीकाठावर स्थापन झालेल्या सर्व उद्योगांचे सांडपाणी प्रक्रिया करूनच नद्यांमध्ये सोडले गेले पाहिजे. अन्यथा, नद्या प्रदूषणमुक्त करण्याची मोहीम हा केवळ फार्सच ठरेल. वाढती लोकसंख्या, शहरीकरण आणि औद्योगिकीकरणामुळे नदीप्रदूषण टिपेला पोहोचले आहे. अशा स्थितीत सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प कार्यक्षमतेने कार्यरत होण्याची गरज अधिक तीव्र झाली आहे. या समस्येचे निराकरण करण्यासाठी केंद्र आणि राज्य सरकारांनी गांभीर्याने पावले टाकणे गरजेचे आहे.

नद्या या केवळ जलस्रोत नसून, त्या भारताच्या संस्कृती, इतिहास आणि अर्थव्यवस्थेचा कणा आहेत. प्राचीन काळापासून नद्यांनी मानवी वसाहतींना जीवनदायी आधार दिला आहे. सिंधू, गंगा, ब्रह्मपुत्रा, नर्मदा, गोदावरी आणि कृष्णा यांसारख्या नद्यांनी भारताच्या सामाजिक, धार्मिक आणि आर्थिक जीवनावर मोठा प्रभाव टाकला आहे.

# एकमेव जगप्रसिद्ध प्रथम छत्रपती

### (छ.शिवाजी महाराज स्मृतिदिन विशेष.)

**छ.शिवाजी महाराजांबद्दल पंडित नेहरू आपल्या डिस्कवरी ऑफ इंडिया- भारताचा शोध या ग्रंथात म्हणतात, 'छत्रपती शिवाजी प्रतिहल्ला करणाऱ्या हिंदू राष्ट्रवादाचे प्रतीक होते. जुन्या इतिहासातून त्यांनी प्रेरणा मिळिवली. महाराज अत्यंत धैर्यशील आणि उत्कृष्ट नेतृत्वगुण असणारे नेते होते. त्यांनी स्वराज्यासाठी चिवटपणे लढणारा गट म्हणून मराठी जनांना एकत्र केले. त्यांच्यामागे राष्ट्रीयत्वाची पार्श्वभूमी उभी केली आणि या गटास अशी चेतना दिली, की या गटाशी धडका घेत मुघल साम्राज्य अखेर मोडकळीस आले. छत्रपतींचा मृत्यू १६८०मध्ये झाला तरी त्यांच्यानंतर संपूर्ण भारतावर प्रभुत्व प्रस्थापित होईपर्यंत मराठ्यांचा राज्यविस्तार होतच राहिला.' रयतेच्या या जाणत्या छत्रपतींच्या प्रेरक स्मृती जागविणारा श्री कृष्णकुमार गोविंदा निकोडे गुरूजी- अलककार यांचा हा लेख... संपादक.**

छत्रपती शिवाजीराजे भोसले हे मराठा साम्राज्याचे संस्थापक होते. भोसले कुळातील या राजाने विजापूरच्या आदिलशाही आणि मोगल साम्राज्य यांच्याविरुद्ध संघर्ष करून मराठा स्वराज्य स्थापन केले. रायगड ही राजधानी असलेले स्वतंत्र मराठा राज्य त्यांनी उभे केले आणि इ.स. १६७४ मध्ये छत्रपती म्हणून राज्याभिषेक करवून घेतला. शिस्तबद्ध लष्कर व सुसंघटित प्रशासकीय यंत्रणेच्या बळावर छ.शिवरायांनी एक सामर्थ्यशाली आणि प्रागतिक राज्य उभे केले. भौगोलिक ज्ञानाचा उपयोग करून आश्चर्यजनक वेगवान हालचालीने बलाढ्य शत्रूंचे मनोधैर्य खचविले. नेमके हल्ले यांचा वापर करून गनिमी काव्याचे तंत्र त्यांनी यशस्वीपणे वापरले. आपल्या वडिलांकडून मिळालेल्या दोन हजार सैनिकांच्या छोट्या तुकडीपासून एक लाख सैनिकांचे लष्कर छत्रपतींनी उभे केले. किनारी आणि अंतर्गत प्रदेशातील किल्ल्यांची डागडुजी करण्यासोबतच अनेक किल्लेही त्यांनी उभारले. राज्य कारभारात मराठी भाषेचा वापर करण्यास त्यांनी प्रोत्साहन दिले. अख्ख्या महाराष्ट्रात ते शिवाजीराजा, शिवाजीराजे, शिवबा, शिवबाराजे, शिवराय अशा अनेक नावांनी ओळखले जातात. शिवाजी महाराजांचा जन्मदिवस हा शिवजयंती म्हणून साजरा होतो. छत्रपती शिवाजी महाराज आणि त्यांचे पुत्र छत्रपती संभाजी महाराज यांचा संयुक्त उल्लेख शिवशंभू असा होतो. सर्वच इतिहासकार सर्वसाधारणपणे शिवाजी महाराजांचा जन्म वर्ष १६३० ते औरंगजेबाचा मृत्यू वर्ष १७०७ यादरम्यानच्या ७७ वर्षांच्या काळास शिवकाल असे म्हणतात.

पुणे जिल्ह्यातील जुन्नर शहरानजीक वसलेल्या शिवनेरी या डोंगरी किल्ल्यावर दि.१९ फेब्रुवारी १६३०मध्ये छत्रपती शिवरायांचा जन्म झाला. एका आख्यायिकेनुसार शिवनेरी गडावरील शिवाई देवीला जिजामातेंनी आपल्याला बलवान पुत्र व्हावा, अशी प्रार्थना केली होती. म्हणून या मुलाचे नाव शिवाजी ठेवले गेले. शिवबांच्या जन्माच्या वेळी दख्खनमधील राजसत्ता ही विजापूर, अहमदनगर व गोवळकोंडा या तीन मुसलमानी सल्तनतींमध्ये विभागली होती. शहाजीराजांनी आपली निष्ठा वेळोवेळी अहमदनगरची निजाम शाही, विजापूरची आदिलशाही आणि मुघल यांच्यादरम्यान बदलली; पण त्यांनी पुणे ही नेहमीच आपली जहागिरी ठेवली व स्वतःची एक लहानशी फौज पदरी बाळगली होती. इ.स.१६४७मध्ये सतरा वर्षांच्या शिवरायांनी आदिलशहाच्या ताब्यातला तोरणगड जिंकला आणि स्वराज्याची मुहूर्तमेढ रोवली. तोरणगड हेच स्वराज्याचे तोरण ठरले. त्याच साली त्यांनी कोंढाणा- सिंहगड आणि पुरंदर हे किल्ले आदिलशहाकडून जिंकून पुणे प्रांतावर पूर्ण नियंत्रण मिळवले. या शिवाय तोरणगडासम ोरील मुरुंबदेवाचा डोंगर जिंकून त्याची डागडुजी केली. त्याचे नवे नाव त्यांनी राजगड असे ठेवले. राजे जेव्हा पुण्याचा कारभार पाहू लागले, तेव्हा त्यांनी स्वतःची स्वतंत्र राजमुद्रा तयार केली. ही राजमुद्रा संस्कृत भाषेत होती. तिचा मराठी अर्थ- ज्याप्रमाणे प्रतिपदेचा चंद्र वाढत जातो, आणि साऱ्या विश्वात वंदनीय होतो, तशीच शहाजींचा पुत्र शिवाजींची ही मुद्रा व तिचा लौकिक वाढत जाईल.

होतही गेले तसेच!

एकेक किल्ले जिंकत राहिल्यामुळे इ.स.१६५९ साली आदिलशहाने दरबारात शिवाजी महाराजांना संपविण्याचा विडा ठेवला.

हा विडा दरबारी असलेल्या अफझलखान नावाच्या सरदाराने



उचलला. मोठ्या सैन्यासह आणि लवाजम्यासह तो मोहिमेवर निघाला. अफझलखान वाईजवळ आला, तेव्हा शिवाजीराजांनी सह्याद्रीच्या महाबळेश्वरजवळ असलेल्या प्रतापगडावरून त्यास तोंड देण्याचे ठरवले. तहाची बोलणी सुरू झाली आणि अंतिम बोलणीसाठी शिवाजी महाराजांनी स्वतः यावे, असा खानचा आग्रह होता. पण राजेंचे वकिल- पंताजी गोपीनाथ बोकील यांनी खानाला गळ घालून प्रतापगडावरच भेट घेण्यास बोलावले. भेटीच्या नियमांनुसार दोन्ही पक्षांकडील मोजकीच माणसे भेटीसाठी येतील, दरम्यान सर्वांनी नि:शस्त्र राहण्याचे ठरले. शिवाजीराजांना खानच्या दगाबाजपणाची कल्पना असल्यामुळे त्यांनी सावधगिरी म्हणून चिलखत चढविले. सोबत बिचवा तसेच वाघनखे ठेवली. बिचवा चिलखतामध्ये दडविला होता, तर वाघनखे हाताच्या पंजाच्या आतमध्ये वळिवलेली असल्यामुळे दिसत नव्हती. महाराजांसोबत जिवा महाला हा विश्वासू सरदार होता, तर अफझलखानसोबत सय्यद बंडा हा तत्कालीन प्रख्यात असा दांडपट्टेबाज होता.



- संकलन व शब्दांकन -
**श्री एन. के. कुमार**
जी. से.नि.अध्यापक.
गडचिरोली मोबा-
७७७५०४१०८६.

प्रताप गडावरील एका छावणीत भेट ठरली. भेटीच्या वेळी उंचपुऱ्या, बलदंड खानाने छत्रपतींना मिठी मारली. राजांचे प्राण कंठाशी आले, त्याच वेळी खानने कट्यारीचा वार महाराजांवर केला, परंतु चिलखतामुळे राजे बचावले. अफझलखानाचा दगा पाहून शिवाजीराजांनी वाघनखे खानाच्या पोटात खुपसली. त्याचबरोबर खानाची प्राणांतिक आरोळी चहूकडे गुंजली. सय्यद बंडाने तत्क्षणी राजांवर दांडपट्ट्याचा जोरदार वार केला, जो तत्पर जिवा महालाने स्वतःवर झेलून शिवाजीराजांचे प्राण वाचले. यामुळेच 'होता जिवा म्हणून वाचला शिवा' ही म्हण प्रचलित झाली.

आधीच ठरलेल्या इशाऱ्याप्रमाणे भेटीच्या वेळी तीन तोफांचे बार प्रतापगडावरून काढण्यात आले. खानाच्या छावणी जवळपासच्या झाडाझुडुपांमध्ये दडून बसलेल्या मावळ्यांनी हल्ला करून खानाच्या सैन्याची दाणादाण उडविली. खानाचा मुलगा फाजलखान आणि इतर काही सरदार लपूनछपून वाईच्या मुख्य छावणीपर्यंत आले. इथे खानाचा जनाना होता. ते पाठलागावर असलेल्या नेताजीच्या सैन्यापासून वाचण्यासाठी खजिना, हत्ती व इतर जड सामान टाकून विजापूरला जनान्यासकट पळाले. खानाच्या मृत्यूनंतर त्यांनी त्याच्या शवाचे अंत्यसंस्कार इस्लामी पद्धतीने केले. त्याची एक कबर प्रतापगडाच्या पायथ्याशी बांधली आणि त्या कबरीच्या कायम देखभालीची व्यवस्था केली. अफजलखानाच्या मृत्यूनंतर शिवाजीराजांनी दोरोजी नावाच्या सरदाराला कोकण पट्टीतील आणखी किल्ले आणि प्रदेश जिंकण्यास पाठवले. स्वतः राजे सातारा प्रांतात घुसून कोल्हापुरापर्यंत गेले व त्यांनी पन्हाळा जिंकून घेतला. नेताजीने त्याच्या सैन्यासह जवळपास विजापुरापर्यंत धडक मारली. आधुनिक काळात अफझलखानच्या मृत्यूचा हा दिवस शिवप्रताप दिन म्हणून साजरा केला जातो.

प्रकृती खालावत गेल्याने रायगडावर हनुमान जन्मोत्सवाच्या वेळी वयाच्या अवघ्या ५०व्या वर्षी दि.३ एप्रिल १६८० रोजी छ.शिवाजी महाराज मृत्युमुखी पडले. त्यांच्याबरोबर त्यांच्या चौथ्या पत्नी महाराणी पुतळाबाई सती गेल्या.

एक उत्तम प्रशासक, उत्तम रयतेचे वाली, हिंदवी स्वराज्य संस्थापक, मराठा साम्राज्य संस्था विस्तारक, शक्तिशाली, निष्ठावान, शूरवीर, मावळ्यांची प्रेरणाशक्ती, जाज्वल्य पराक्रमाने इतिहास रचणारे राजे दृष्टीआड झाले होते. छ.शिवाजी महाराजांचे नाव प्रत्येक भारतीयांच्या हृदयमंदिरात असे सुवर्णाक्षरांनी कोरले गेले, की ते आजतागायत अधिकच झळाळून चमकू लागले आहे, हे सांगणे न लगेच!

!! छत्रपती शिवरायांच्या अनेक अविस्मरणीय स्मृतींना मानाचा लवून मुजरा !!

# काँग्रेस सरकारने दिल्लीतील १२५ मालमत्ता वक्फला दिल्या - अमित शाह

## वक्फ बोर्डाने कोल्हापूर, बीड जिल्ह्यांतील मंदिरांच्या जमिनींवरील केला दावा; तर आज वक्फ विधेयकात बदल करण्याची वेळच आली नसती!

**नवी दिल्ली (वृत्तसंस्था)**

वक्फ विधेयकात २०१३ मध्ये जे बदल झाले, त्यामुळेच आज हे बदल करण्याची वेळ आली आहे. त्यावेळी काँग्रेस सरकारने दिल्लीतील लुटियन्स भागातील १२५ मालमत्ता वक्फला दिल्या. उत्तर रेल्वेची जमीन वक्फला दिली. हिमाचल प्रदेशात वक्फची जमीन सांगून मशीद बांधली. दान आपल्या संपत्तीचे केले जाऊ शकते, सरकारी जमिनींचे नाही. वक्फ एक प्रकारचे चॅरिटेबल एंडोरमेंट आहे. यात व्यक्ती पवित्र दान करते. दान अशाच गोष्टीचे केले जाते जी आपली आहे. सरकारी मालमत्ता अथवा इतर कुणाच्या मालमत्तेचे दान करता येत नाही, असे सांगत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी सरकारची भूमिका स्पष्ट केली. यावेळी शाह यांनी, तामिळनाडूपासून कर्नाटकपर्यंतची काही उदाहरणे दिली ज्यावर विरोधकांनी गदारोळ केला आणि त्यांच्यावर सभागृहाची दिशाभूल केल्याचा आरोप करण्यात आला.

वक्फ सुधारणा विधेयक लोकसभेत सादर करण्यात आले आहे. त्यावर दोन्ही बाजूने चर्चा, आरोप-प्रत्यारोप करण्यात आले. अमित शाह म्हणाले, मी या विधेयकाच्या बाजूने बोलत आहे. मला वाटते, एक तर निर्दोष भावनेने अथवा राजकीय कारणांमुळे सदस्यांच्या मनात अनेक गैरसमज आहेत आणि ते पसरवण्याचे कामही सुरू आहे. मी काही गोष्टी स्पष्ट करण्याचा प्रयत्न करेन. वक्फ एक अरबी शब्द आहे. याचा इतिहास काही हदीसशी (इस्लामी धर्मग्रंथ) संबंधित सापडतो. आज ज्या अर्थाने वक्फ शब्दाचा वापर केला जातो, त्याचा अर्थ आहे अल्लाहच्या नावावर मालमत्तेचे दान. आम्ही आज जो अर्थ समजत आहोत, तो इस्लामचे दुसरे खलीफा उमर यांच्या काळात अस्तित्वात आला.



एक लाख अडतीस हजार एकर जमीन भाड्याने देण्यात आली, खाजगी संस्थांची जमीन शंभर वर्षांच्या भाडेपट्ट्यावर हस्तांतरित करण्यात आली, विजयपूर गावातील १५०० एकर जमीन दावा करून वादात टाकण्यात आली. पंचतारांकित हॉटेल १२००० रुपये भाड्याने देण्यात आले. दरमहा १२००० रुपये दिले आणि सांगितले की हे पैसे गरीब मुस्लिमांचे आहेत. हे श्रीमंतांनी चोरी करण्यासाठी नाही. त्यांचे कंत्राटदार बोलतात. दरम्यान शाह यांनी महाराष्ट्रातील वक्फ बोर्डाने दावा केलेल्या दोन जमिनींचा उल्लेख केला. कोल्हापूर जिल्ह्यातील वडणगे या गावातील एका मंदिराच्या जमिनीवर वक्फ बोर्डाने दावा केला आहे, तसेच बीड जिल्ह्यातील कंकलेश्वर मंदिराच्या जमिनीवर दावा केला आहे.

दुसरीकडे कर्नाटकात मंदिराच्या ६०० एकर जमिनीवर दावा केला. तसेच ख्रिश्चन समुदायाच्या मालकीच्या बऱ्याच जमिनीवर दावा केला. अनेक गट वक्फ विधेयकाला विरोध करत आहेत. अखिलेशजी, मुस्लिम बांधवांकडून सहानुभूती घेऊन काही फायदा होणार नाही. दक्षिणेकडील हे खासदार जे असे बोलत आहेत ते त्यांच्या क्षेत्रातील सर्व चर्चना संपवत आहेत. तेलंगणामधील १७०० एकर जमिनीवर आणि आसाममधील मोरेगाव जिल्ह्यातील जमिनीवर दावे करण्यात आले. हरियाणातील गुरुद्वाराची जमीन वक्फला सुपूर्द करण्यात आली. प्रयागराजमधील चंद्रशेखर आझाद उद्यानालाही वक्फ घोषित करण्यात आले. हे सर्व चालू आहे, वक्फ हा मुस्लिम बांधवांच्या देणग्यांमधून तयार केलेला ट्रस्ट आहे, सरकार त्यात हस्तक्षेप करू इच्छित नाही. लाखो कोटी रुपयांची जमीन आणि १२६ कोटी रुपयांचे उत्पन्न. हे आपल्याला उत्पन्नाचा उद्देश काय आहे ते सांगतात, असंही शाह म्हणाले.

अमित शाह यांनी स्पष्ट केले की, वक्फमध्ये कोणत्याही गैर-मुस्लिमाची नेमणूक होणार नाही. धार्मिक संस्थांच्या व्यवस्थापनासाठी गैर-मुस्लिम ांना नियुक्त करण्याचा कोणताही विचार नाही. वक्फ परिषद आणि वक्फ बोर्डची स्थापना १९९५ मध्ये झाली. हा कायदा मुस्लिमांच्या धार्मिक कामात हस्तक्षेप करतो, हे चुकीचे आहे. काही लोक अल्पसंख्याकांमध्ये भीती निर्माण करत आहेत आणि मतांसाठी खोट्या बातम्या पसरवत आहेत. वक्फ विधेयक का महत्त्वाचे आहे, यावर शाह यांनी सांगितले की, वक्फचा कायदा म्हणजे कुणीतरी दान केलेली संपत्ती, तिचे व्यवस्थापन व्यवस्थित चालले आहे की नाही, कायद्यानुसार चालले आहे की नाही, हे पाहणे. दान ज्या काम ासाठी दिले आहे, इस्लाम धर्मासाठी दिले आहे, गरिबांच्या मदतीसाठी दिले आहे, त्या उद्देशासाठी उपयोग होत आहे की नाही, हे पाहण्याचे काम हे विधेयक करते. या विधेयकामुळे वक्फच्या संपत्तीचे योग्य व्यवस्थापन होईल. तसेच, ज्या उद्देशांसाठी दान दिले आहे, ते उद्देश पूर्ण होतील, असे शाह यांनी सांगितले.

# कन्यादिन साजरा; पीसीपीएनडीटी, बालविवाह प्रतिबंध कायद्याची जनजागृती

## मुलींच्या जन्माचे स्वागत करा-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

**छत्रपती संभाजीनगर (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

पिंप्री राजा ग्रामपंचायत येथे कन्या दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.प्रत्येक मुलीच्या जन्माचे स्वागत करा आणि बाल विवाहाला विरोध करा, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी यावेळी उपस्थित ग्राम स्थांना केले.



मुलींच्या जन्मदराचे प्रमाण संतुलित राहावे आणि बालविवाह रोखण्यासाठी जनजागृती करण्याच्या उद्देशानेजिल्हा प्रशासनाच्या वतीने मराठी नव वर्षाचे औचित्य साधून जिल्हाभरात हा उपक्रमप्रत्येक ग्राम पंचायतीत राबविण्यात येत आहे.

जिल्हाधिकारी स्वामी यांच्या प्रमुख उपस्थितीत मुख्य कार्यक्रमाचे आयोजन पिंप्री राजा ग्रामपंचायत आवारात करण्यात आले. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी, सरपंच श्रीमती वैशाली पवार, उपसरपंच मोहसीन सय्यद, उपविभागीय अधिकारी डॉ. व्यंकट राठोड, गटविकास अधिकारी मीना रावताळे, जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. विशाल बेंद्रे, तालुका आरोग्य अधिकारी डॉ. सावरगावकर, तसेच बालविकास प्रकल्प अधिकारी श्रीमती भंडारे यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविक करताना डॉ. विशाल बेंद्रे यांनी ग्रामीण भागात मुलींच्या जन्मदराच्या घटत्या प्रमाणावर चिंता व्यक्त केली. तसेच पी सी पी एन डी टी कायद्याच्या तरतूदीविषयी माहिती दिली. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आपल्या मार्गदर्शनात मुलींच्या जन्माचे स्वागत करण्याचे आणि त्यांचे संगोपन चांगल्या पद्धतीने करण्याचे आवाहन केले. तसेच बालविवाह आणि गर्भलिंग निदानास प्रतिबंध करणाऱ्या कायद्यांची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी जनजागृती गरजेची असल्याचे त्यांनी सांगितले.मालमत्ता जमवत असतांना पर्यावरण रक्षण, जल व मृद संवर्धन आणि स्वच्छता यासारख्या शाश्वत गोष्टींवर ही काम करावे असे त्यांनी उपस्थितांना सांगितले. कार्यक्रम ाच्या शेवटी उपस्थित ग्रामस्थांना बालविवाह आणि गर्भलिंग निदान चाचणीस विरोध करण्याची शपथ देण्यात आली.

कार्यक्रमाला ग्रामस्थांचा मोठा प्रतिसाद लाभला. शेवटी गटविकास अधिकारी मीना रावताळे यांनी आभार मानले.

# आपले सरकार सेवा केंद्रांची संख्या दुपटीने वाढणार; शुल्कातही वाढ

अहिल्यानगर : राज्य सरकारने ‘आपले सरकार सेवा केंद्रां’ची (सेतू केंद्र) संख्या दुप्पट करण्याचा निर्णय घेतानाच या सेवा केंद्रातून देण्यात येणाऱ्या सेवांच्या दरातही वाढ केली आहे. याशिवाय घरपोच सेवा देण्यासाठी १०० रुपये अतिरिक्त अकारण्याचा निर्णय घेतला आहे.

राज्य सरकारच्या सामान्य प्रशासन विभागाने या संदर्भातील निर्णय जाहीर केला आहे. यापूर्वी सन २०१८ मध्ये आपले सरकार सेवा केंद्र स्थापन करण्यासाठी निकष ठरवण्यात आले होते. साडेसहा वर्षांनंतर त्यामध्ये बदल करण्यात आला आहे. लोकसंख्येत झालेल्या वाढीच्या पार्श्वभूमीवर आपले सरकार सेवा केंद्राच्या संख्येत वाढ करण्याचा व त्यांच्या स्थापनेसाठी असलेल्या निकषात बदल करण्यात आला आहे. त्याचबरोबर सेवा केंद्रातून देण्यात येणाऱ्या सेवा शुल्कातही वाढ करण्यात आली आहे. आता ३३.६० रुपयांऐवजी ५० रुपये आकारले जाणार आहेत. आपले सरकार सेवा केंद्रामार्फत ४२० प्रकारच्या दाखल्यांच्या सेवा दिल्या जातात.

अहिल्यानगर जिल्ह्यात सध्या १ हजार २४२ ग्रामपंचायती, १३ महाविद्यालये व जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत ८२८ असे एकूण २०८३ आपले सरकार सेवा केंद्र स्थापन झाले आहेत. ग्रामपंचायतीमध्ये आपले सरकार सेवा केंद्र चालवण्याची जबाबदारी ऑपरेटरवर देण्यात आली आहे. त्यांच्याकडेच त्यासाठीचे ‘आयडी’ देण्यात आले होते, मात्र ग्रामपंचायतीऐवजी हे ऑपरेटर बाहेरच ‘आयडी’चा वापर करत असल्याने आता ग्रामपंचायतीच्या नावानेच आयडी दिले जाणार आहेत. या संदर्भातील आदेशही जारी करण्यात आला आहे. जिल्ह्यात आता १ हजार २३४ ग्रामपंचायतींमधून आपले सरकार सेवा केंद्र सुरू केले जातील.

५० रुपये शुल्क करण्यात आल्यानंतर त्याम ध्ये राज्य सेतू केंद्रांचा वाटा ५ टक्के, महाआयटीचा वाटा २० टक्के, जिल्हा सेतू सोसायटीचा वाटा १० टक्के तर आपले सरकार सेवा केंद्र चालकाचा वाटा ६५ टक्के राहणार आहे. आपले सरकार सेवा केंद्र चालकांकडून सेवांचे दर वाढवण्याची मागणी करण्यात आली होती, त्याचा विचार करून सध्याच्या सेवा दरात सुधारणा करण्यात आल्याचे आदेशात नमूद करण्यात आले आहे.

**लोकसंख्येचा निकष** – नवीन निकषानुसार प्रत्येक ग्रामपंचायत क्षेत्रात २ आपले सरकार सेवा केंद्र स्थापण्यात येईल, मात्र ५ हजारपेक्षा अधिक लोकसंख्या (२०११ च्या जनगणनेनुसार) असलेल्या ग्रामपंचायतीत किमान ४ केंद्र स्थापन करण्यात येईल. शहरी भागांतील केंद्रासाठी महापालिका व नगरपरिषद येथील १० हजार लोकसंख्येसाठी दोन केंद्र, प्रत्येक नगरपंचायत क्षेत्रात किमान २ केंद्र स्थापन करण्यात येईल, मात्र ५ हजारपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या नगरपंचायतीत किमान ४ केंद्र स्थापन करण्यात येणार आहेत. या निकषात आवश्यकतेप्रमाणे बदल करण्यात येतील.

आपले सरकार सेवा केंद्रांतर्गत नागरिकांना त्यांच्या मागणीनुसार आपले सरकार पोर्टलवर प्रत्येक घरपोच सेवेच्या नोंदणीसाठी १०० रुपये (कर वगळून) शुल्क निश्चित करण्यात आले आहे. हे शुल्क आपले सरकार सेवा केंद्र चालकांमार्फत नागरिकांकडून गोळा करण्यात येईल. त्यामध्ये महाआयटी सेवादराचा वाटा २० टक्के तर आपले सरकार सेवा केंद्रचालकाचा वाटा ८० टक्के असेल. या दराव्यतिरिक्त प्रति अर्ज रुपये ५० रुपयाप्रमाणे अर्जदाराकडून सेवाशुल्क घेण्यात येईल.

# शंभर दिवसांच्या कृती कार्यक्रमाची माहिती सर्व विभागांनी संकेतस्थळांवर उपलब्ध करुन द्यावी - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस



**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राज्यात शंभर दिवसांसाठीचा कृती आराखडा ही संकल्पना व्यापक प्रमाणात यशस्वी ठरली असून या अंतर्गत विविध विभागांमार्फत आतापर्यंत ४११ काम ांसंदर्भातील कार्यवाही पूर्ण झाली आहे. तर कार्यवाही सुरू असलेली ३७२ कामे लवकरच पूर्ण होणार आहेत. शंभर दिवस कार्यक्रमांतर्गत ८५ टक्के कामे पूर्ण करण्याची कौतुकास्पद कामगिरी विविध विभागांनी केली आहे. सर्व विभागांनी येत्या १ मे पर्यंत सर्व कामे पूर्ण करावीत तसेच प्रत्येक विभागाने शंभर दिवस कार्यक्रमाची माहिती आपल्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन द्यावी, असे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले.

सह्याद्री अतिथीगृह येथे शंभर दिवस कृती कार्यक्रमासंदर्भात आढावा बैठक मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, मुख्य सचिव सुजाता सौनिक, विभागांचे मंत्री, संबंधित अपर मुख्य सचिव, प्रधान सचिव, सचिव उपस्थित होते.

मुख्यमंत्री श्री.देवेंद्र फडणवीस म्हणाले की, शंभर दिवसांसाठीचा कृती आराखडा कार्यक्रम विभागांनी गांभीर्याने यशस्वी केला आहे. अनेक विभागांनी यामध्ये उत्तम काम केले आहे. नागरिकांना या माध्यमातून उपयुक्त आणि तत्पर सेवा-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर शंभर दिवसांसाठी कार्यक्रम ाचा कालावधी १५ दिवस वाढविण्यात आला आहे. येत्या १ मे रोजी सर्व विभागांनी आपल्या संकेतस्थळावर विभागांनी संकल्पित केलेली कामे व पूर्ण झालेली कामे याची माहिती उपलब्ध करुन द्यावी. त्यासोबतच काही कार्यवाही अपूर्ण राहिली असतील तर त्याची कारणे संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्याच्या सूचनाही श्री. फडणवीस यांनी यावेळी दिल्या.

विभागांनी गतीमानतेने लोकोपयोगी कामे गुणवत्तेसह आणि कालमर्यादेत पूर्ण करावीत. लोकप्रतिनिधींच्या पत्रांवर तत्परतेने कार्यवाही करण्यासाठी विभागांनी आपल्यास्तरावर यंत्रणा कार्यान्वित करावी. उद्दिष्टांच्या पूर्ततेच्या यशस्वी अमंलबजावणीसाठी तांत्रिक, प्रशासकीय आणि इतर अनुषंगिक बाबींची तातडीने पूर्तता करावी. विभागांनी उपलब्ध निधीचा सुयोग्य वापर करण्यास प्राधान्य द्यावे, असे निर्दे श मुख्यमंत्री फडणवीस यांनी यावेळी दिले. बैठकीत एकूण २६ विभागांच्या कार्यवाहीचा आढावा घेण्यात आला. विभागांचे ९३८ मुद्द्यांपैकी ४११ मुद्द्यांवर (४४%) पूर्णतः काम झाले आहे. तसेच, ३७२ मुद्दे (४०%) अंतिम टप्प्यात असून ते निश्चित वेळेत पूर्ण होतील. १५५ मुद्दे प्रगतीपथावर आहेत. या कामांच्या पूर्ततेबाबत सुरु असलेल्या कार्यवाहीची माहिती संबंधित विभागांनी दिली. त्यासाठी त्यांना १५ दिवसांचा अतिरिक्त कालावधी देण्यात आला आहे. उपमुख्यमंत्री एकनाथ श्री.शिंदे म्हणाले, शंभर दिवस कार्यक्रमांतर्गत विभागांनी गतीमान काम करुन लोकाभिमुख कार्यपद्धतीचा अनुभव जनतेला दिला आहे. त्यातून शासनाप्रती जनतेमध्ये चांगला दृष्टीकोन तयार होत आहे.

शंभर दिवस कार्यक्रम ही संकल्पना अंत्यत उपयुक्त असून जिल्हास्तरावरही चांगला बदल होत आहे. अनेक प्रकल्प, मोठी कामे शंभर दिवसाच्या कालावधीत साकारली आहेत. त्यासोबत अनेक विभागांच्या सेवा ऑनलाईन झाल्या आहेत, त्याचा जनतेला विशेष लाभ होत आहे. या सर्व उत्तम काम गिरीसाठी उपमुख्यमंत्री श्री.शिंदे यांनी विभागांचे अभिनंदन केले.

# रेडी रेकनर दरासाठी जीआयएस तंत्रज्ञानावर आधारीत सर्व्हे करा - मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

राज्यात रेडी रेकनरचे दर लागू करण्यात आले आहे. यामध्ये क्षेत्रनिहाय दर असणे गरजेचे आहे. झोपडपट्टी, चाळी, औद्योगिक, वाणिज्यिक, पुर्नविकास आदीबाबत वेगवगळे दर असावे. यासाठी विभागाने आधुनिक तंत्रज्ञानाची मदत घेत जीआयएस तंत्रज्ञानावर आधारीत सर्व्हे करून क्षेत्रनिहाय दर तयार करावेत, असे निर्देश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी आज मंत्रालयात रेडी रेकनर दराबाबत आयोजित बैठकीत दिल्या.



बैठकीला आमदार सर्वश्री प्रवीण दरेकर, सुनील शिंदे, महसूल विभागाचे अपर मुख्य सचिव राजेश कुमार उपस्थित होते, तर दूरदृश्य प्रणालीद्वारे आमदार ॲड. अनिल परब, आमदार सचिन अहीर, नोंदणी महानिरीक्षक रविंद्र बिनवडे आदी उपस्थित होते.

मंत्री बावनकुळे म्हणाले की, मुंबई शहरामध्ये प्राधान्याने या सर्व्हेची सुरूवात करावी.

सिटी सर्व्हे क्रमांकानुसार मुंबई शहरातील जीआयएस तंत्रज्ञानावर आधारीत सर्व्हे पूर्ण करावा. याबाबत कालबद्ध कार्यक्रम आखून कार्यवाही पूर्ण करावी. याबाबत मुंबई शहरातील लोकप्रतिनिधींच्या सूचना घेण्यात याव्यात. रेडी रेकरनच्या दरामध्ये दुरूस्ती करायची असल्यास वर्षातून दोनवेळा दुरूस्ती करण्याचे अधिकार शासनाकडे घेण्यात यावे. याबाबत कार्यवाही करावी.

मुंबई शहरातील क्षेत्रनिहाय रेडीरेकरनच्या दराबाबत धोरण ठरविण्यासाठी मुंबईतील सर्व आमदार, सर्व संबंधीत शासकीय यंत्रणा प्रमुख यांच्या बैठकीचे आयोजन करण्यात यावे, अशा सूचनाही मंत्री बावनकुळे यांनी दिल्या.

# लातूर जिल्हा क्रीडा संकुलाचे अद्ययावतीकरण करावे - क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे

**मुंबई (अट्टल संकेत प्रतिनिधी)**

लातूर येथे भव्य विभागीय क्रीडा संकुल उभारण्यासाठीची कार्यवाही जलद गतीने करावी. लातूर जिल्हा क्रीडा संकुल येथे क्रीडापट्टूंसाठी मूलभूत सोयी-सुविधा उपलब्ध करून अद्ययावतीकरण करण्यात यावे. तसेच इतर सुविधा उपलब्ध करून देण्यासाठीही टप्प्या-टप्प्याने विकास करण्याचे निर्देश क्रीडा मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिले.



जिल्हा क्रीडा संकुलाचा पुनर्विकास व लातूर येथील विभागीय क्रीडा संकुल उभारणीस गती देणेबाबत मंत्रालयात बैठक झाली. बैठकीस आमदार अमित देशमुख, क्रीडा व युवक कल्याणचे सहसंचालक सुधीर मोरे, जिल्हा क्रीडा अधिकारी जगन्नाथ लकडे, उप जिल्हा क्रीडा अधिकारी संगीता टकले आदिसह अधिकारी उपस्थित होते.

क्रीडा मंत्री भरणे म्हणाले की, जिल्हा क्रीडा संकुलाचे अद्यावतीकरण व नवीन क्रीडा सुविधा निर्माण करण्याकरिता प्रत्यक्ष जागेची पाहणी करून, मुलभूत सेवांना प्राधान्य देण्यात यावे. तसेच आवश्यकतेनुसार टप्प्याटप्प्याने अद्ययावतीकरण करण्यात यावे. तसेच प्रेक्षा गॅलरीची उभारणी आणि जुन्या प्रेक्षा गॅलरीस शेड उभारण्यात यावी. यासाठी अनुदान वितरीत करण्याची कार्यवाही त्वरीत करावी.

याचबरोबर नांदेड, धाराशिव आणि लातूर जिल्ह्यांसाठी विभागीय क्रीडा संकुल लातूर येथे उभारण्यात येणार आहे. तसेच इतर विभागीय क्रीडा संकुलासाठी उपलब्ध सोयी-सुविधांचा अभ्यास करून त्याच धर्तीवर विभागीय क्रीडा संकुलाच्या उभारणीसंदर्भातील कार्यवाही करण्याच्या निर्देशमंत्री भरणे यांनी दिले.

आमदार अमित देशमुख यांनी क्रिकेट प्रबोधिनी उभारणे, क्रीडा संकुलाचा रस्ता, अल्पसंख्यांक वर्गातील मुलांचे वसतीगृह यासंदर्भात सूचना केल्या. यासंदर्भात क्रीडा मंत्री भरणे यांनी सकारात्मक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या.

हे वृत्तपत्र मालक, मुद्रक , प्रकाशक - श्री. **रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** यांनी मानसी प्रिंटर्स, प्लॉट नं. ४ ५ ए , सर्व्हिस इंडस्ट्री सेक्टर , सिडको, औरंगाबाद (महा.) - ४ ३ १ ० ० ५ येथे छापून शॉप नं. ३, केशरदिप कॉम्प्लेक्स, एन- ७, सिडको पोलीस स्टेशन जवळ, औरंगाबाद (महा.)- ४ ३ १ ० ० ३ येथे प्रसिध्द केले.

• **संपादक : रशपालसिंग निरंजनसिंग अट्टल** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • RNI No. MAHMAR/2023/87816

This Daily Printed, Published and Owned by **RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** Printed at Mansi Printers, Plot No. 45 A, Service Industry Sector, Aurangabad (M.S.)- 431005 and Published at Shop No. 3, Keshardeep Complex, N-7, Near Cidco Police Station, Aurangabad (M.S.)- 431003

• **Editor : RASHPALSINGH NIRANJANSINGH ATTAL** • मो. **7588166496** • Email : **attalsanket2023@gmail.com** • RNI No. MAHMAR/2023/87816